ePaper आधी निवडणुकीत मात, आता विक्रम धोक्यात; फडणवीस पवारांना मागे टाकणार



|| वर्ष - 8 | अंक -147 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- टीम इंडिया उपांत्य फेरीत दाखल!
- जैस्वाल-विराट बसला फटका
- संभल'वरून आरोपांची चिखलफेक
- सुखबीर सिंग बादल यांच्यावर गोळीबार!

www.mahaenews.com | गुरूवार, दिनांक 05 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# मैं समंदर हूं लौटकर आऊंगा!

## एकनाथ शिंदेंबाबत सस्पेन्स कायम; आज 5 वाजता शपथविधी सोहळा

| मुंबई | महाईन्यूज

**देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचं निश्चित झाल्यानंतरही एकनाथ शिंदेंची सरकारमध्ये काय भूमिका असणार याबाबत सस्पेन्स कायम आहे. राजभवनात जाऊन सत्तास्थापनेचा दावा केल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी एकनाथ शिंदेंची वर्षा बंगल्यावर त्यांची भेट घेतली. या भेटीत मंत्रिमंडळावर चर्चा झाल्याची माहिती आहे. परंतु, त्यानंतर काहीच अधिकृत माहिती समोर आलेली नाही.**



२३ नोव्हेंबर रोजी राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला. परंतु, महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले तरी मुख्यमंत्रीपदामुळे सत्तास्थापनेचा तिढा निर्माण झाला होता. एकनाथ शिंदे या पदासाठी अडून बसल्याची चर्चा होती. गेल्या आठवड्यात दिल्लीतील बैठक संपल्यानंतर ते थेट सातारा येथील त्यांच्या दरे या गावी गेले. तिथे गेल्यावर त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुढील बैठका होऊ शकल्या नाहीत.

त्यामुळे मुख्यंत्रीपदाचा सन्सेन्स कायम होता. गावाहून मुंबईला पोहोचल्यानंतरही त्यांची भूमिका स्पष्ट न झाल्याने राज्यात अधांतरित वातावरण होतं. अखेर त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन सत्तास्थापनेसाठी माझी कोणतीच अडसर नसेल अशी भूमिका घेतल्याने ते मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतून मागे आल्याचं म्हटलं गेलं.

### एकनाथ शिंदेंबाबत सस्पेन्स कायम

दरम्यान, ५ डिसेंबर रोजी ५ वाजता राज्यात शपथविधी सहळा होणार आहे. या सोहळ्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. तर, आणखी दोन उपमुख्यमंत्रीपदाची शपथविधी होईल. परंतु, उपमुख्यमंत्रीपदाच्या रुपाने कोण शपथ घेईल हे अद्याप गुलदस्त्यात आहे. याबाबत काल (४ डिसेंबर) सायंकाळपर्यंत खुलासा करू असं देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या भेटीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं होतं. परंतु, काल रात्री उशिरापर्यंत हा खुलासा आला नाही. त्यामुळे एकनाथ शिंदेंची भूमिकाही आता सन्सेन्स ठरली आहे. इतर वृत्तांनुसार, एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीपदासाठी राजी झाले असून त्यांनी इतर महत्त्वाच्या खात्यांची मागणी केलेली आहे. परंतु, आज इतर मंत्र्यांचा शपथविधी होणार नसल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांनी कोणती खाती मागितली आणि कोणत्या खात्यांची मागणी मान्य झाली, हे आगामी काळात कळेल.



### मंत्रिमंडळ रखडणार?

मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूर अधिवेशनापूर्वी ११ किंवा १२ डिसेंबरला करण्याचे ठरविण्यात आले आहे. मंत्रीपदासाठी कोणाला संधी द्यायची, खातेवाटप आणि मंत्रीपदांच्या वाटपाचा पेच यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत संपूर्ण मंत्रिमंडळाचा जंगी शपथविधी करण्याचे नियोजन तूर्तास फिसकटले आहे. मात्र महायुतीतील पेच सोडविण्यासाठी रात्री उशिरापर्यंत फडणवीस आणि शिंदे यांच्या निवासस्थानी वरिष्ठ नेत्यांच्या बैठका सुरु होत्या आणि फडणवीस यांनी पक्षश्रेष्ठींशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. केवळ तिघांचा शपथविधी न करता आणखी प्रत्येकी दोन किंवा तीन म्हणजे एकूण नऊ किंवा बारा मंत्र्यांचा शपथविधी करण्याच्या मुद्द्यावर वरिष्ठ नेत्यांची रात्री उशिरापर्यंत चर्चा सुरु होती. याबाबतचा निर्णय अद्यापही समोर आलेला नाही.

### एकनाथ शिंदे यांना सन्मान मिळाला पाहिजे

"महायुतीमध्ये एकनाथ शिंदे यांना सन्मान मिळाला पाहिजे असं मी देवेंद्र फडणवीस यांना सांगितलं आहे", असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. तसेच, "एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्री करून त्यांना सन्मान देणार असल्याचं फडणवीसांनी मला सांगितलं आहे", असंही आठवले म्हणाले. यासह केंद्रीय राज्यमंत्र्यांनी त्यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) या पक्षासाठी फडणवीसांकडे महाराष्ट्राच्या नव्या सरकारमध्ये एक मंत्रीपद मागितलं आहे. आठवले यांनी स्वतःच याबाबतची माहिती दिली. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरला नव्हता त्या काळात आठवले यांनी दिल्लीत प्रसारमाध्यमांसमोर सातत्याने देवेंद्र फडणवीसांची बाजू मांडली होती. फडणवीस पुढचे मुख्यमंत्री व्हायला हवेत, अशी भूमिका त्यांनी अनेकदा मांडली. त्यापाठोपाठ आता आठवले आता एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्रीपद दिलं जावं यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत.

# चिंचवड येथील उड्डाणपूल जमीनदोस्त?

## रेल्वे विभागाच्या सूचनेनुसार हा पूल पाडण्याचा निर्णय

| पुणे |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**चिंचवड स्टेशन येथील जुन्या पुणे-मुंबई महामार्ग व चिंचवडगावास जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे आयुर्मान संपल्याने रेल्वे विभागाच्या सूचनेनुसार हा पूल पाडण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. नवीन पुलाच्या उभारणीसाठी सल्लागार नियुक्तीस आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.**



दोन समांतर रेल्वे उड्डाणपूल अस्तित्वात आहेत. त्यापैकी चिंचवड स्टेशनवरुन चिंचवड गावाकडे जाताना उजव्या बाजुकडील पूल नवीन आहे. तसेच, डाव्या बाजुकडील पूल हा जुना आहे. जुन्या पुलाचे आयुर्मान संपत आले असल्याने तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने या पुलाची पाहणी करण्यात आली होती. या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट तज्ज्ञ संस्थेकडून करून घेण्यात आले होते. या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल महानगरपालिकेने आकुर्डी येथील पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरींग यांच्यामार्फत त्रयस्थपणे छाननी करून घेतला होता. त्यातच भारतीय रेल्वे विभागाने देखील पिंपरी-चिंचवड महापालिकेला संबंधित पुलाच्या स्लॅबवरील डेड लोड कमी करण्याबाबत पत्र पाठवले होते. दरम्यानच्या काळात पुलाच्या केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटचे सादरीकरण महापालिका आयुक्त यांच्यासमोर करण्यात आले. त्यानंतर आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार स्ट्रक्चरल ऑडिट अहवालाबाबत निष्कर्ष काढणे, आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेचे शहर अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीची बैठकीत स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल व रेल्वे विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार काही उपाययोजना सूचवल्या होत्या. त्यानुसार महानगरपालिकेने पुलाच्या स्लॅबवरील डेड लोड कमी केला. तसेच जुन्या पुलाची स्थिती पाहता तो अवजड वाहतूक, बस यांच्यासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला. या पुलावरून केवळ हलक्या वाहनांची वाहतूक सुरू ठेवण्यात आली आहे. जुन्या पुलावरून बस वाहतूक बंद असल्यामुळे चिंचवडकडे जाणाऱ्या बसेस आणि अवजड वाहने दळवी नगरमार्गे वळसा घेऊन जात आहेत. त्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी जुन्या पुलावरून अवजड वाहतूक सुरू करण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींकडून महापालिकेकडे करण्यात येत होती. या मागणीस अनुसरून महापालिका आयुक्तांनी सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत सदर पुलावरून जड वाहतूक सुरू करण्याच्या दृष्टिने रेल्वे विभागाशी सल्लामसलत करुन नवीन रेल्वे उड्डाणपूल बांधणेसाठी तत्वतः मान्यता देण्यात आली. रेल्वे विभागाने देखील सदर पुलाबाबत महानगरपालिकेस अभिप्राय सादर केला होता. या अभिप्रायामध्ये रेल्वे विभागाने सदरचा पूल जीर्ण झाला असल्याने व सुरक्षिततेच्या दृष्टिने महानगरपालिकेने नवीन पूल बांधवा, असे सुचीत केले होते. अखेर समितीचा अहवाल, रेल्वे विभागाचा पूल नवीन बांधण्याचा अहवाल, लोकप्रतिनिधी यांची पुलावरील जड वाहतुक चालू करण्याची मागणी या सर्व बाबींचा विचार करता हा जुना पूल पाडुन तेथे नवीन पूल बांधण्यात येणार आहे. त्यासाठी स्थायी व सर्वसाधारण सभेत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी नविन पुल बांधणे व पुलाचे कामासाठी सल्लागार नेमण्याचे कामास मंजुरी दिली आहे.पिंपरी येथील उड्डाणपुलाचे रेल्वेच्या सल्ल्यानुसार स्ट्रक्चरल ऑडिट करून मजबुतीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते.

### रेल्वे विभागाच्या सल्ल्याने कार्यवाही

सदर काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. हे काम झाल्यामुळे पुलाचे आयुर्मान देखील ५ ते १० वर्षांनी वाढले आहे. आता या पुलाबाबत भविष्यात पाच वर्षानंतर स्ट्रक्चरल ऑडिट करून रेल्वे विभागाच्या सल्ल्याने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पिंपरी येथील पूल पाडण्याची सूचना किंवा लेखी पत्र रेल्वे विभागाकडून प्राप्त झालेले नाही.

# मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

## पोलिसांकडून तीन तरुणी ताब्यात; मसाज पार्लर चालकावर गुन्हा

| पुणे | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**बाणेर भागात मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा प्रकार गुन्हे शाखेच्या पथकाने उघडकीस आणला. पोलिसांनी तीन तरुणींना ताब्यात घेतले, तसेच मसाज पार्लरच्या चालकासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.**



सताउद्दिन मोहम्मद दिलावर हुसेन (वय २२, रा. जुनी सांगवी) याच्यासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. शहरातील बेकायदा व्यवसाय, जुगार, मटका अड्डे, तसेच मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. आदेश धुडकावून काही जण बेकायदा व्यवसाय करत असून, बाणेर भागात ‘मून थाई स्पा येथे मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंधक कक्षाला मिळाली. पोलिसांच्या पथकाने बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केली. मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तेथे छापा टाकला.

मसाज पार्लरचा चालक तरुणींना पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त करत असल्याचे उघडकीस आले. त्याच्याविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली भरोसा सेलच्या पोलीस निरीक्षक संगीता जाधव यांच्या पथकाने ही कारवाई केली.याप्रकरणी मसाज पार्लरचा चालक सताउद्दिन मोहम्मद दिलावर हुसेन याच्यासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### तीन तरुणी ताब्यात

शहरातील बेकायदा व्यवसाय, जुगार, मटका अड्डे, तसेच मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. आदेश धुडकावून काही जण बेकायदा व्यवसाय करत असून, बाणेर भागात ‘मून थाई स्पा येथे मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंधक कक्षाला मिळाली. पोलिसांच्या पथकाने बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केली. मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तेथे छापा टाकला.

## पिंपरी-चिंचवडमध्ये बनावट कपडे विक्रीचा गोरखधंदा

# ‘ब्रँडेड’च्या नावाखाली “बनावटगिरी”!

### वाकड येथे कारवाई; लाखोंचा माल जप्त; नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर तपासणी मोहीम

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**‘मोठ्या कंपन्यांच्या नावाने बनावट कपडे विक्री होत असल्याचे समोर आले आहे. ‘ब्रँडेड’ असल्याचे सांगत बनावट कपड्यांचा साठा करून, ब्रँडेड कंपनीचे नाव वापरून त्या कपड्यांची विक्री केल्याप्रकरणी वाकडमध्ये कारवाई करण्यात आली. यानिमित्ताने पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवडमध्ये कपड्यांचा गोरख धंदा उघडकीस आला आहे.**





ब्रॅण्डेड कपड्यांच्या नावाखाली काही दुकानदारांकडून ग्राहकांची दिशाभूल केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. ब्रॅण्डेड कंपन्यांचे नाव आणि लोगो वापरून आपल्या पदरात बनावट माल तर पडत नाही ना?, याबाबत ग्राहकांनी सजग राहणे आवश्यक आहे. सध्याच्या फॅशनच्या युगात लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाला स्टाईलमध्ये राहण्याची सवय जडली आहे. सोशल मिडीयाच्या जगात तर आपले ‘स्टेटस’ दाखवण्यासाठी प्रत्येक जण आतुर असतो. प्रत्येकाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यासाठी तरूणाईला नवनवीन स्टाईलची ओढच असते. मोबाईल असो की घड्याळ आणि कपडे असो की शुज त्यात ब्रॅण्डेड वस्तु खरेदी करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. त्यातही कपडे खरेदी करताना प्रत्येक व्यक्ती चोखंदळ असते. आपल्या राहणीमानावर अन् त्यातही आपण परिधान करत असलेल्या कपड्यांच्या बाबतीत प्रत्येकाची आपआपली आवड ठरलेली असते. त्यासाठी ब्रॅण्डेड कपडे खरेदी करण्याकडे प्रत्येक ग्राहकांचा कल दिसून येतो.

यंदाच्या वर्षाचा शेवटचा महिना सुरू असून नवीन वर्षाचे वेध अनेकांना लागले आहेत. या निमित्ताने परदेश वाऱ्या केल्या जातात. अनेक पर्यटन स्थळांना भेटी दिल्या जातात अशावेळी ब्रँडेड कपडे खरेदी करण्याकडे खास करून तरुणाईचा देखील कल असतो. याच गोष्टीचा फायदा व्यापारी वर्ग करून घेतो. मात्र या निमित्ताने अनेकदा ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे देखील दिसून आले आहे. असाच प्रकार वाकड येथील पूर्वी कॅज्युअल्स येथे घडला आहे. या प्रकरणी अरुण नरेश शर्मा (वय 38, रा. वाकड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





### अडीच लाख रुपयांचे बनावट कपडे जप्त...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अरुण शर्मा याचे कस्पटे वस्ती वाकड येथे पूर्वी कॅज्युअल्स नावाचे कपड्यांचे दुकान आहे. त्याने दुकानामध्ये लुईस फिलीप, एलेन सोली, पीटर इंग्लंड, व्हॅन हुसेन कंपनीचे स्टिकर असलेले जीन्स व टी-शर्ट विक्रीसाठी ठेवले. बनावट कपडे विक्री होत असल्याची माहिती कंपनीला मिळाल्यानंतर कंपनीकडून पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी याबाबत कारवाई करत दोन लाख 63 हजार 230 रुपये किमतीचे बनावट कपडे जप्त केले आहेत.

> “कपड्यांची गुणवत्ता, शिलाई यावरून ओरिजनल आणि बनावट यामधील फरक ओळखता येणे कठीण जाते. ब्रॅण्डचे लोगो आणि लेबल लावून त्याची विक्री केल्यास कॉपीराईट अधिकाराचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई होते. आपल्या ब्रॅण्डच्या वस्तुंची बनावट विक्री होऊ नये, याकरिता नामांकीत ब्रॅण्डच्या कंपन्यांमार्फत प्रतिनिधींची नियुक्ती केलेली असते. या प्रतिनिधींमार्फत दुकानांमध्ये पोलीसांच्या मदतीने तपासणी केली जाते. नवीन वर्षाच्या पार्श्वभुमीवर पोलीसांमार्फत या कंपन्यांच्या प्रतिनिधींच्या मदतीने परिसरातील दुकानांची तपासणी केली जात आहे.”
>
> **-सुभाष चव्हाण,** सहायक पोलीस निरीक्षक, वाकड..



### आंतरराष्ट्रीय ब्रँडसचे हूबेहूब बनावट टॅग्से

ब्रॅण्डेड कपड्यांच्या बटणांवर ब्रॅण्डचे नाव लिहिलेले असते. तर, कॉपी केलेल्या कपड्यांवर साधारण बटणे लावतात. बऱ्याच वेळा कपड्यांवरील ब्रॅण्डचा लोगो बघून गोंधळ होतो. ब्रॅण्डेड कपडे खरेदी करताना आपण त्यांच्या टॅग्ससह त्यांना ओळखतो. परंतु, बाजारपेठेत त्यांच्या बनावट कपड्यांवर हूबेहूब तसेच टॅग्स लावून विकले जातात. बरेच ब्रॅण्ड असे आहेत जे कपड्यांच्या लायनिंगवर टॅग्स लावतात. ज्याच्या सहाय्याने त्यांची खरी ओळख होते. बॅण्डेड कंपन्या शक्यतो आपल्या उत्पादनांवर मोठी सवलत देत नाहीत. कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी काही लोक ब्रॅण्डच्या नावातील स्पेलिंगमध्ये बदल करतात. यामुळे खरेदी करताना लोगो पाहत असतानाच ब्रॅण्डच्या नावाचे स्पेलिंगही तपासून पाहणे गरजेचे असते.



## भूमिका

# इम्रान खान यांचे भवितव्य अधांतरी

**इम्रान खान एक क्रिकेटपटू म्हणून यशस्वी होते. त्यांनी राजकारणात पदार्पण केले, यशही मिळविले. परंतु, त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. संधीचे सोने करता आले नाही. अनेक अडचणींतून, काट्याकुट्यातून मार्ग काढावा लागला. अजूनही त्यांची ही बिकट वाट संपलेली नाही. त्यामुळे त्यांचे भवितव्य अधांतरी आहे.**



किस्तान दुहेरी संकटातून वाटचाल करीत आहे. एकीकडे बलुचिस्तानमधील बंडखोर रोज काहीना काही हिंसक कारवाया करीत आहेत; तर दुसरीकडे प्रमुख विरोधी असलेल्या पक्ष 'पीटीआय' या पक्षाचे नेते माजी पंतप्रधान इम्रान खान हे अस्तित्वासाठी निकराचा संघर्ष करीत आहेत. त्यांच्या अनेक महाप्रतापांमुळे ते सध्या तुरुंगात आहेत; पण त्यांचे समर्थक म्हणतात, त्यांची तत्काळ सुटका करावी, त्यांच्या समर्थकांनी केलेल्या हिंसक आंदोलनामुळे आंदोलक, पक्ष कार्यकर्ते, पोलिस यंत्रणा व लष्कर यात चकमकी झाल्या. त्यात अनेक लोकांना आपल्या प्राणास मुकावे लागले. आंदोलनाला नेहमीप्रमाणेच हिंसक गालबोट लागले. जेव्हा आंदोलन चिघळले तेव्हा या पक्षाच्या नेत्यांवर राजकीय मैदानातून पळ काढण्याची वेळ आली. या साऱ्या प्रकरणामुळे पाकिस्तानातील लोकशाहीचे खरे स्वरूप जगासमोर आले आहे आणि तेथील राजकीय व्यवस्था किती तकलादू आहे, याचा प्रत्यय आला आहे. इम्रान खान यांना आपल्या राजकीय अस्तित्वासाठी ही लढाई म्हणजे एक कसोटी सामनाच होय. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना शेवटपर्यंत लढा देण्याचे आवाहन केले आहे. याचा अर्थ असा की, त्यांना निराशेने ग्रासले आहे व त्यांनी हात टेकले आहेत. इम्रान यांच्या हजारो पक्ष समर्थकांनी नियमांचा भंग केल्यामुळे या हिंसक होत असलेल्या जमावावर अश्रुधूर, लाठीमार आणि रबरी गोळ्यांचा प्रथम वर्षाव करण्यात आला. जमाव आवाक्यात येत नाही हे पाहून शेवटी शूटर्जेंट साईटचा आदेश देण्यात आला. इम्रान खान यांच्याविरोधात शंभरपेक्षा अधिक गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सरकारी वस्तू भेट आलेल्या आपल्या घरी नेल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध तोशाखाना प्रकरण लावण्यात आले आहे. त्यात ते अत्यंत वाईट पद्धतीने फसले आहेत. ते आपल्या सुटकेसाठी जामीन मागतात; पण त्यांना अशी कोणतीही सवलत मिळत नाही. त्यांची ही कोंडी पाहून त्यांच्या सुटकेचे सर्व मार्ग संपल्याने ते तुरुंगातून जनआंदोलनाची चळवळ चालवत आहेत आणि त्यांच्या पीटीआय या पक्षाचे नेतृत्व त्यांच्या पक्षनेत्यांप्रमाणेच त्यांच्या पत्नीही करीत आहेत. राजकारणात एकदा अपयश पदरी आले की, ते सतत मागे लागते. त्याचेच इम्रान हे उदाहरण आहे. पाकिस्तानी लष्कराची चंचल आणि धरसोडपणाची वृत्ती, शिया आणि सुन्नीमधील वाद, बलुचिस्तानातील हिंसक आंदोलने, अहमदी जमातीवर झालेले अत्याचार तसेच चीनचा पडलेला आर्थिक विळखा आणि कमालीची अस्थिरता या सर्व कारणांमुळे पाकिस्तानचे राजकारण चंचल आणि अस्थिर बनले आहे व सारा देश समस्यांच्या चक्रव्यूहात सापडला आहे. अशा देशात सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील संबंधांची चौकट पूर्णपणे बिघडल्यामुळे इम्रान खान यांच्या नशिबी हा दुर्दैवाचा फेरा आलेला आहे. आंतरराष्ट्रीय पाकिस्तान तहरिक-ए-इन्साफ या पक्षाने इम्रान खान यांच्या सुटकेसाठी हे प्रखर आंदोलन सुरू केले होते. जोपर्यंत काही निर्णय मिळत नाही तोपर्यंत राजधानी सोडायची नाही, अशी त्यांनी शपथ घेतली होती; पण लष्कराच्या कारवाईनंतर आंदोलकांच्या लक्षात आले की, सरकार नमणार नाही आणि शेवटी त्यांनी पडत्या फळाची आज्ञा घेऊन आंदोलन थांबविले. सरकारच्या क्रूरतेमुळे निषेध म्हणून आंदोलन थांबविण्यात येत आहे, अशी घोषणा करण्याची वेळ या पक्षावर आली. कंटेनरवर बसून प्रार्थना करणाऱ्या एका व्यक्तीला अधिकाऱ्याने ढकलून दिल्यानंतर जमाव प्रक्षुब्ध झाला आणि त्यानंतर धुमश्चक्री सुरू झाली. खान यांच्या पत्नी बुशरा बीबी आंदोलकांच्या मध्यभागी होत्या. परिस्थिती हाताबाहेर जात आहे असे पाहून त्यांनीही जीव वाचविण्यासाठी पळ काढला. पाकिस्तानात अन्नधान्याची टंचाई आहे. महागाईचे दर आकाशाला भिडले आहेत. सामान्य माणसाचा जीवमेटाकुटीस आला आहे. या सर्व प्रश्नांवर आंदोलने करण्याऐवजी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष एकमेकांच्या द्वेषातून हल्ले व प्रतिहल्ले करीत आहेत.

## प्रासंगिक »

### आव्हान!

***पक्षाबाहेरही फडणवीस यांनी वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. त्यांना आता पक्षात स्थानिक पातळीवर तरी आव्हानवीर/ स्पर्धक नाही...***

सर्वप्रथम देवेंद्र फडणवीस यांचे मन:पूर्वक अभिनंदन. आधी सहकारी, नंतर प्रतिस्पर्धी आणि मध्ये स्वपक्षीय श्रेष्ठी अशा तीन पातळ्यांवर अपमान आणि अवहेलना सहन करून ते स्पर्धेत टिकून राहिले आणि असा विजय संपादित केला की त्यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ घालण्याखेरीज अन्य कोणताही पर्याय नेतृत्वासमोर शिल्लक राहिला नाही. या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयाचा आकार इतका आहे की एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांसही फडणवीस यांच्या हातास हात लावून 'मम' म्हणण्याखेरीज फार काही करण्यास वाव राहणार नाही. एव्हाना या दोघांनाही भाजपचे नेतृत्व ही काय चीज आहे याचा पुरेसा अंदाज आलेला असणार. या दोघांचेही मागे वा अन्य कोठे जायचे दोर आता कापले गेलेले आहेत. त्यामुळे पदरात पडेल ते त्यांस गोड मानून घ्यावे लागणार. त्यास इलाज नाही.

महाराष्ट्रातील जनतेने विधानसभा निवडणुकीत स्पष्टपणे भारतीय जनता पार्टी आणि देवेंद्र फडणवीस यांना कौल दिलेला आहे. 2014 च्या निवडणुकीपेक्षा यंदाच्या निवडणुकीत मतदारांनी नऊ जागा जास्त देत भाजपला स्पष्ट बहुमताच्या जवळ आणून ठेवले आहे.

# ...तर शिंदेसेना फुटायला वेळ लागणार नाही



भाजपचे स्वतःचे 132 आमदार आणि पाच अपक्ष आमदारांचा पाठिंबा याशिवाय 41 उमेदवारांना जिंकून आणलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपला आणि मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा देऊन भाजपच्या नेतृत्वाखाली युती सरकार स्थापन करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. अशावेळी मनाचा मोठेपणा दाखवण्याऐवजी संकुचित वृत्तीचे दर्शन घडवून एकनाथ शिंदे यांनी सरकार स्थापन करण्याचा मार्गच रोखून धरलेला नाही तर गेल्या अडीच वर्षात कमावलेल्या त्यांच्याच प्रतिमेला त्यांनी धक्का दिला आहे. एकनाथ शिंदे मोठा निर्णय घेण्याची शक्यता असलेल्या चर्चांना उधाण आले आहे. मोठा निर्णय म्हणजे शिंदे सत्तेत सहभागी न होता बाहेरून पाठिंबा देणार असतील तर शिंदेंची शिवसेना फुटायला वेळ लागणार नाही. एकनाथ शिंदे यांनी चाळीस आमदार आणि तेरा खासदारांसह शिवसेनेत बंड पुकारल्यानंतर 105 आमदार असलेल्या भारतीय जनता पक्षाने मनाचा मोठेपणा दाखवत एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पद दिले होते. तर मुख्यमंत्री राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना अनुभवाने कनिष्ठ असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या हाताखाली उपमुख्यमंत्री म्हणून काम करण्यास भाग पाडले होते. फडणवीस यांनी हा अवमान सहन करत अडीच वर्ष शिंदे यांच्या पाठीशी उभे राहत स्थिर महायुती सरकार दिले. शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा फायदा घेत लोकसभा निवडणुकीत स्वतःचे खासदार निवडून आणलेत. मराठ्यांना ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण हवे आहे, ही मागणी करणाऱ्या जरांगे पाटील यांना शिंदे यांनी पूर्ण ताकद दिली. यातून राज्यात ओबीसी आणि मराठा समाजात टोकाचा संघर्ष पेटला. भाजपचा पारंपरिक मतदार असलेला ओबीसी भाजपपासून दूर गेला आणि त्याचा फटका भाजपला लोकसभा निवडणुकीत बसला. लोकसभा निवडणुकीनंतर देवेंद्र फडणवीस यांनी सर्व अल्पसंख्य ओबीसींची मोट बांधली आणि त्यांच्यात विश्वास जागवला. ओबीसी हाच भाजपचा डीएनए आहे, हे त्यांनी पटवून दिले. ओबीसी मधल्या छोट्या मोठ्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना भेटून त्यांचा विश्वास पुन्हा प्राप्त केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबरोबर समन्वय साधत संघाच्या सर्व संघटनांना प्रचाराच्या मैदानात उतरवले. या सर्वांचा परिपाक म्हणजे मोदी लाट नसतानाही भाजपने राज्यात 132 उमेदवार निवडून आणले. 2014 मध्ये मोदी लाट असताना भाजपला 123 जागी विजय मिळवतात 2019 मध्ये मोदींची 2014 पेक्षा मोठी लाट असतानाही भाजपला केवळ 105 जागांवर समाधान मानावे लागले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री होणार

## शपथविधी आझाद मैदानावर साडेपाच वाजता पार पडणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार असून, महायुतीचा शपथविधी सोहळा आझाद मैदानावर उद्या साडेपाच वाजता पार पडणार आहे. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील उपस्थित असणार आहेत. भाजपच्या विधीमंडळातील गट नेतेपदी फडणवीस यांची एकमताने निवड करण्यात आली.**




देवेंद्र फडणवीसच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यात दोन उपमुख्यमंत्री देखील शपथ घेणार आहेत. असं असलं तरीही मंत्रिमंडळात एकनाथ शिंदे सामील होणार का? यावर अद्यापही प्रश्न असल्याचं चित्र आहे. देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं की, 'मी काल स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी गेलो होतो. तुम्ही स्वत: या सरकारमध्ये आमच्यासोबत राहायला हवं, असं निवदेन मी एकनाथरावांना केल आहे.. एकनाथ शिंदेंनीही सरकारमध्ये राहावं, अशी शिवसेनेच्या आमदारांची देखील इच्छा आहे. महायुतीच्या आमदारांची देखील हीच इच्छा आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, ते आमच्या सरकारमध्ये असतील.' फडणवीसांच्या या वक्तव्यामुळे एकनाथ शिंदे महायुतीच्या मंत्रीमंडळात असणार की नाही हा प्रश्न सध्या राजकीय वर्तुळात निर्माण झाला आहे. मला आनंद आहे की अडीच वर्षांपूर्वी इथंच देवेंद्रजींनी मी मुख्यमंत्री व्हावं म्हणून माझ्या नावाची शिफारस केली होती. आज देवेंद्रजी मुख्यमंत्री व्हावेत, अशी शिफारस आणि पाठिंब्याचं पत्र शिवसेनेच्या वतीनं आज आम्ही दिलं आहे. या पत्रकार परिषदेपूर्वी शिवसेनेचा पाठिंबा आणि पूर्ण समर्थन भाजपच्या उमेदवाराला, देवेंद्रजींना देऊन टाकला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष जे.पी. नड्डा जो निर्णय घेतील त्यांना पाठिंबा असेल अशी भूमिका मी यापूर्वीच घेतली आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. दरम्यान, राजशिष्टाचार विभागाकडून ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे , राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर या सर्वांना उद्याच्या शपथविधीसाठी निमंत्रण देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. उद्या साडेपाच वाजता आझाद मैदान येथे शपथविधी सोहळा पार पडणार आहे. यामध्ये विरोधी पक्षनेते त्यासोबतच राज्यातील इतर राज्याचे पक्षप्रमुख, पक्ष अध्यक्ष यांना सुद्धा राज शिष्टाचार विभागाकडून निमंत्रण देण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवारांच्या शपथविधीसाठी पक्षाचे इतर राज्यांचे प्रमुखही लावणार हजेरी लावणार आहेत. दिल्ली, मणीपूर, नागालँड आणि मेघालय राज्याचे प्रमुख मुंबईत दाखल होणार आहेत.

महायुतीच्या शपथविधी समारंभात तिन्ही पक्षाचे राष्ट्रीय पातळीवर नेते हजेरी लावणार आहेत. मुंबईच्या आझाद मैदानात महायूतीच्या शपथविधीसाठी मुंबई पोलिसांकडून चोख पोलिस बंदोबस्त असणार आहे. या शिवास आझाद मैदान परिसर हा नो फ्लाईग झोन म्हणून घोषित करण्यात आला असून, आजूबाजूच्या उंच इमारतींवरही पोलिस तैनात असणार आहेत. शिवाय ड्रोन द्वारेही पोलिसांची करडी नजर असणार आहे. महायुतीमधील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची आज एक महत्त्वाची बैठक वर्षा निवासस्थानीवर पार पडली.

या बैठकीनंतर आता राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा करण्यासाठी महायुतीचे हे तिन्ही नेते राजभवनावर दाखल झाले आहेत. दरम्यान, संख्याबळासाठी आमदारांच्या स्वाक्षरीचं पत्र राज्यापालांना देण्यात आलं आहे. देवेंद्र फडणीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे या महायुतीमधील प्रमुख नेत्यांनी राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केला आहे. देवेंद्र फडणवीसच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यात दोन उपमुख्यमंत्री देखील शपथ घेणार आहेत. असं असलं तरीही मंत्रिमंडळात एकनाथ शिंदे सामील होणार का? यावर अद्यापही प्रश्न असल्याचं चित्र आहे.

देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं की, 'मी काल स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी गेलो होतो. तुम्ही स्वत: या सरकारमध्ये आमच्यासोबत राहायला हवं, असं निवदेन मी एकनाथरावांना केल आहे.

### महायुतीनी दिलं सत्तास्थापनेचं पत्र

एकनाथ शिंदेंनीही सरकारमध्ये राहावं, अशी शिवसेनेच्या आमदारांची देखील इच्छा आहे. महायुतीच्या आमदारांची देखील हीच इच्छा आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, ते आमच्या सरकारमध्ये असतील.' फडणवीसांच्या या वक्तव्यामुळे एकनाथ शिंदे महायुतीच्या मंत्रीमंडळात असणार की नाही हा प्रश्न सध्या राजकीय वर्तुळात निर्माण झाला आहे. मला आनंद आहे की अडीच वर्षांपूर्वी इथंच देवेंद्रजींनी मी मुख्यमंत्री व्हावं म्हणून माझ्या नावाची शिफारस केली होती. आज देवेंद्रजी मुख्यमंत्री व्हावेत, अशी शिफारस आणि पाठिंब्याचं पत्र शिवसेनेच्या वतीनं आज आम्ही दिलं आहे. या पत्रकार परिषदेपूर्वी शिवसेनेचा पाठिंबा आणि पूर्ण समर्थन भाजपच्या उमेदवाराला, देवेंद्रजींना देऊन टाकला होता.

# गेटवे ऑफ इंडियाला 100 वर्ष पूर्ण!

## कमानी मुस्लिम शैलीच्या तर सजावट हिंदू शैलीनुसार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेटवे ऑफ इंडिया... फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात लोकप्रिय असलेली वास्तू. मुंबईत येणारा प्रत्येक व्यक्ती मग तो भारतीय असो की परदेशी प्रत्येकालाच गेटवे ऑफ इंडिया पाहण्याची इच्छा असते. मुंबईच्या अरबी समुद्राजवळ असलेले गेटवे ऑफ इंडिया हे भारताचे प्रवेश द्वार म्हणून ओळखले जाते.**

गेटवे ऑफ इंडिया या वास्तूला 4 डिसेंबर 2024 रोजी बरोबर 100 वर्ष पूर्ण झाली आहेत. गेटवे ऑफ इंडियाच्या कमानी मुस्लिम शैलीच्या तर सजावट हिंदू शैलीनुसार आहेत. गेटवे ऑफ इंडिया या वास्तूच्या बांधकामाचा इतिहास खूपच इंटरेस्टिंग आहे.

मुंबईतल्या अपोलो बंदराच्या समुद्र किनाऱ्यावर दिमाखात उभी असलेली वास्तू म्हणजे गेटवे ऑफ इंडिया. ही भव्य दिव्य वास्तू पाहून सगळेच जण अचंबित होतात. 16 व्या शतकात उभारण्यात आलेल्या गेटवे ऑफ इंडिया या वास्तूने 100 वर्षात अनेक संकटे पाहिली आहेत. ब्रिटीश राजवटीत बांधण्यात आलेल्या गेटवे ऑफ इंडिया ही



वास्तू 26/11 सारख्या दहतवादी हल्ल्याचा साक्षीदार आहे. ब्रिटिश सम्राट किंग जॉर्ज पंचम आणि राणी मेरी यांच्या पहिल्या भेटीच्या स्मरणार्थ हे स्मारक बांधण्यात आले होते. शाही भेटीच्या वेळी गेटवे ऑफ इंडिया या प्रवेशद्वाराचे बांधकाम पूर्ण झाले नव्हते. यामुळे सम्राटाचे स्वागत कार्डबोर्डच्या संरचनेद्वारे करण्यात आले. डिसेंबर 1911 मध्ये ही संरचना उभारण्यात आली. गुजराती स्थापत्यकलेचा समावेश करून इंडो-सारासेनिक शैलीत गेटवे ऑफ इंडियाचे बांधकाम करण्यात आले.

### 4 वर्षांनी बांधकाम पूर्ण

मार्च 1913 मध्ये या स्मारकाची पायाभरणी करण्यात आली. 1914 मध्ये वास्तुविशारद जॉर्ज विटेट यांनी स्मारकासाठी अंतिम डिझाइन मंजूर केले. 1920 मध्ये गेटवे ऑफ इंडियाचे बांधकाम सुरू झाले, त्यानंतर 4 वर्षांनी बांधकाम पूर्ण झाले आणि शेवटी 4 डिसेंबर 1924 मध्ये गेटवे ऑफ इंडिया सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात आले. 85 फूट उंच रचना बेसाल्टने बांधलेली आहे आणि त्यावर विजयी कमान आहे. या प्रवेशद्वाराजवळील समुद्रात पर्यटकांना भेट देण्यासाठी बोट सेवाही उपलब्ध आहे. गेटवे ऑफ इंडियाच्या कमानी मुस्लिम शैलीनुसार आहेत. याच्या सजावटीवर हिंदू शैलीची छाप पहायला मिळते. गेटवे ऑफ इंडियाच्या मध्यवर्ती घुमटाचा व्यास 48 फूट आहे.

# संभलवरून आरोपांची चिखलफेक!

## राहुल गांधींचा ताफा गाझीपूर वेशीवर रोखला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या संभल दौऱ्यावरून बुधवारी रणकंदन माजले. उत्तर प्रदेशातील हिंसाचारग्रस्त संभलकडे निघालेल्या काँग्रेस नेत्यांचा ताफा संसदेपासून सुमारे ३० किमीवर असलेल्या गाझीपूर सीमेवर अडवला गेला. राहुल गांधी व प्रियंका गांधी-वढेरा यांचा पोलिसांची नाकाबंदी तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर भाजपने राहुल गांधींवर स्टंटबाजीचा आरोप केला.**




> राहुल गांधींच्या दौऱ्यामुळे संभलमधील संवेदनशील परिस्थिती चिघळण्याची भीती होती. तिथली परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी शहराबाहेरील लोकांसाठी प्रवेशबंदी लागू केली आहे. त्यामुळे काँग्रेस नेत्यांनाही तिथे जाण्यास मनाई करण्यात आली.
>
> **– प्रल्हाद जोशी,** केंद्रीय मंत्री

> लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून संभलला जाण्याचा मला अधिकार आहे. मी एकटा जाण्यास तयार असल्याचे मी सांगितले, मी पोलिसांबरोबर जायलाही तयार आहे. पण, त्यांनी दोन्हीपैकी एकही पर्याय स्वीकारला नाही.
>
> **– राहुल गांधी,** विरोधी पक्षनेता, लोकसभा

संसदेच्या दोन्ही सदनांतही काँग्रेस नेत्यांच्या अडवणुकीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. केंद्र सरकार व उत्तर प्रदेश सरकारच्या भूमिकेचा निषेध करत काँग्रेसच्या सदस्यांनी दोन्ही सदनांचा सभात्याग केला. संभलमध्ये मुघलकालीन शाही जमा मशिदीच्या सर्वेक्षणावरून झालेल्या हिंसाचारानंतर तणावाची परिस्थिती आहे. पीडित कुटुंबाची विचारपूस करण्यासाठी राहुल गांधी संभलच्या दौऱ्यावर निघाले होते.संसदेतील दोन्ही सदनांमध्ये संभलमधील हिंसाचारावर चर्चा करण्यात आली. या चर्चेत काँग्रेसचे नेते सहभागी झाले असले तरी संभलचा मुद्दा गांभीर्याने घेतला नसल्याचा आरोप समाजवादी पक्षाने केला. राहुल गांधी यांनी संभलचा दौरा आधीच जाहीर केला असला तरी, काँग्रेसचे नेते औपचारिकतेचा भाग म्हणून संभलाला भेट देत आहेत, अशी टीका 'सप'चे राज्यसभेतील खासदार रामगोपाल यादव यांनी केली. गाझीपूरमध्ये राहुल गांधींचा ताफा अडवला गेल्यानंतर मात्र समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी राहुल गांधींना पाठिंबा दिला. भाजपच्या आडमुठेपणावरही अखिलेश यांनी टीका केली. राहुल गांधी हिंसाचारग्रस्त भागाला भेट देऊन येणार होते, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा कोणता प्रश्न निर्माण होता, असा सवाल अखिलेश यादव यांनी केला.काँग्रेसच्या नेत्यांना संभलप्रकरणाशी काहीही घेणेदेणे नाही. या मुद्द्यावर काँग्रेसच्या एकाही नेत्याने ना टिप्पणी केली ना भूमिका मांडली. आता अचानक काँग्रेसला संभलमधील हिंसाचाराची आठवण आली आहे. प्रसारमाध्यमांमध्ये चमकण्यासाठी राहुल गांधी व प्रियंका गांधी-वढेरा यांनी नाट्य निर्माण केले. 'इंडिया' आघाडी फुटीच्या मार्गावर असून त्यांना एकत्र ठेवण्याच्या खटाटोपाच्या भाग म्हणून राहुल गांधींना नाइलाजाने संभलचा दौरा आयोजित करावा लागला, अशी टीका भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ता व राज्यसभेतील खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी केली.संसदेच्या दोन्ही सदनांतही काँग्रेस नेत्यांच्या अडवणुकीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. केंद्र सरकार व उत्तर प्रदेश सरकारच्या भूमिकेचा निषेध करत काँग्रेसच्या सदस्यांनी दोन्ही सदनांचा सभात्याग केला. संभलमध्ये मुघलकालीन शाही जमा मशिदीच्या सर्वेक्षणावरून झालेल्या हिंसाचारानंतर तणावाची परिस्थिती आहे. पीडित कुटुंबाची विचारपूस करण्यासाठी राहुल गांधी संभलच्या दौऱ्यावर निघाले होते.संसदेतील दोन्ही सदनांमध्ये संभलमधील हिंसाचारावर चर्चा करण्यात आली. या चर्चेत काँग्रेसचे नेते सहभागी झाले असले तरी संभलचा मुद्दा गांभीर्याने घेतला नसल्याचा आरोप समाजवादी पक्षाने केला. राहुल गांधी यांनी संभलचा दौरा आधीच जाहीर केला असला तरी, काँग्रेसचे नेते औपचारिकतेचा भाग म्हणून संभलाला भेट देत आहेत, मगोपाल यादव यांनी केली. गाझीपूरमध्ये राहुल गांधींचा ताफा अडवला गेल्यानंतर मात्र समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी राहुल गांधींना पाठिंबा दिला. भाजपच्या आडमुठेपणावरही अखिलेश यांनी टीका केली. राहुल गांधी हिंसाचारग्रस्त भागाला भेट देऊन येणार होते, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा कोणता प्रश्न निर्माण होता, असा सवाल अखिलेश यादव यांनी केला.काँग्रेसच्या नेत्यांना संभलप्रकरणाशी काहीही घेणेदेणे नाही. या मुद्द्यावर काँग्रेसच्या एकाही नेत्याने ना टिप्पणी केली ना भूमिका मांडली. आता अचानक काँग्रेसला संभलमधील हिंसाचाराची आठवण आली आहे.

# सुखबीर सिंग बादल यांच्यावर गोळीबार!

## या हल्ल्यात अकाली दलाचे नेते बादल अगदी थोडक्यात बचावले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंजाबमधीलअमृतसर येथे सुवर्ण मंदिराच्या प्रवेशद्वारावर शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर सिंग बादल यांच्यावर एका व्यक्तीने गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात सुखबीर सिंग बादल हे अगदी थोडक्यात बचावले आहेत. दरम्यान या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला असून या गोळीबाराच्या घटनेनंतर उपस्थित लोकांनी गोळीबार करणाऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतले.**



### सेवादार म्हणून सुवर्णमंदिरात सेवा

क्लॉक टॉवरच्या बाहेर एक भाला धरून बसले होते. त्यानंतर त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. 2 डिसेंबर रोजी, राम रहीम प्रकरणातील 5 सिंग साहिबांची श्री अकाल तख्त साहिब येथे बैठक झाली, ज्यामध्ये त्यांना आणि इतर मंत्रिमंडळ सदस्यांना शिरोमणी अकाली दल सरकारच्या काळात धार्मिक गैरवर्तनाच्या आरोपाखाली शिक्षा सुनावण्यात आली. या प्रकरणात, 30 ऑगस्ट 2024 रोजी सुखबीर सिंग बादल यांना श्री अकाल तख्तने 'तनखैय्या' (धार्मिक गैरवर्तनासाठी दोषी) घोषित केले होते.

मात्र हा गोळीबार का करण्यात आला याबद्दल अद्याप माहिती मिळू शकलेली नाहीनिळ्या रंगाचा सेवादरांचा पेशाख घातलेले बादल त्यांच्या व्हील चेअरवर बसललेले दिसत आहेत. सोमवारी (२ डिसेंबर) बादल यांना 'अकाल तख्त'कडून धार्मिक शिक्षा देण्यात आली आहे. त्यामुळे पाय फ्रॅक्चर असलले बादल हे व्हिलचेअरवर बसून सुवर्ण मंदिराबाहेर सेवा देत होते. दरम्यान या घटनेबद्दल पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचे नाव नारायण सिंग चौडा असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. या हल्ल्यामागील कारण अद्याप समजू शकले नाही असेही पोलिसांनी स्पष्ट केले. सुखबीर सिंग बादल यांच्यावर बुधवारी सुवर्ण मंदिराबाहेर गोळीबार करण्यात आला. मात्र, ते थोडक्यात बचावले. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आरोपीला पकडले. त्याच्याकडून एक पिस्तूलही जप्त करण्यात आले आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सुखबीर बादल यांना सुरक्षित केले आहे. गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचे नाव नारायण सिंह चौडा असे असून तो गुरुदासपूर येथील डेराबाबा नानकचा रहिवासी आहे.

# जान्हवी कपूरचं टी-शर्ट पाहिलंत का?



जान्हवी कपूर आणि शिखर पहारिया यांचे नाते बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहे. त्यांच्या डेट नाईट्सपासून अनेक गोष्टी नेहमी चर्चेत असतात. जान्हवी कपूर अनेक मुलाखतींमध्ये तिचा प्रियकर शिखर पहारिया विषयी भरभरून बोलते. काही दिवसांपूर्वी जान्हवी कपूरने 'शिकू' नावाचा नेकलेस परिधान केला होता. आता जान्हवीने शिखरच्या नावाचे टीशर्ट घातले असून त्यावर त्याचा फोटो असल्याचे दिसत आहे. हा फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. व्हायरल झालेला फोटो हा नाशिकमधील एका हॉटेलचा असून जान्हवी कपूर एका सिनेमाच्या शूटिंगसाठी येथे आली होती. तिच्या बरोबर या सिनेमात वरूण धवन सुद्धा दिसणार आहे.सोशल मीडियावर जान्हवीच्या व्हायरल झालेल्या फोटोमध्ये वरूण आणि ती दिसत असून यात नाशिकमधील हॉटेलचे कर्मचारी दिसत आहे. जान्हवी आणि वरुण दोघे त्यांचा आगामी चित्रपट 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी'च्या चित्रीकरणासाठी नाशिकमध्ये आले होते. मात्र, या फोटोमध्ये सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते म्हणजे जान्हवीने परिधान केलेल्या टी-शर्टने. या खास टी-शर्टवर तिच्या प्रियकर शिखर पहारिया याचे नाव आणि त्याचा फोटो प्रिंट केला होता. हा फोटो हॉटेलच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर करण्यात आला होता. त्याच्या कॅप्शनमध्ये त्यांनी लिहिले , "आमच्यासाठी हा एक अभिमानाचा क्षण होता की आम्हाला बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध कलाकार जान्हवी कपूर आणि वरूण धवन यांचा पाहुणचार करता आला. हा क्षण आमच्यासाठी 'पिंच अस' मूव्हमेंटसारखा होता."जान्हवीने यापूर्वीही तिचा प्रियकर शिखरसाठी तिचे प्रेम जाहीरपणे व्यक्त केले आहे. यावर्षी एप्रिल (२०२४) महिन्यात तिचे वडील बोनी कपूर यांच्या 'मैदान' चित्रपटाच्या स्क्रीनिंगदरम्यान तिने शिखरच्या नावाचा खास नेकलेस घातला होता.

# अमिताभ बच्चन यांनी फक्त एक रुपया मानधनावर केलं होतं 'मोहब्बतें'मध्ये काम



बॉलीवूडमध्ये असे अनेक चित्रपट आहेत, जे बॉक्स ऑफिसवर जोरदार हिट झालेत. ९० च्या दशकात आलेला 'मोहब्बतें' चित्रपट आजही अनेक प्रेक्षकांच्या आवडीचा आहे. या चित्रपटाची कथा आणि सर्वच कलाकारांचा उत्तम अभिनय यांमुळे लाखो चाहत्यांना आजही हा चित्रपट पुन्हा पुन्हा पाहावासा वाटतो. चित्रपटात अमिताभ बच्चन यांनी नारायण शंकर हे पात्र साकारलं होतं. पण, तुम्हाला माहितीये का? या चित्रपटात काम करण्यासाठी अमिताभ बच्चन यांनी फक्त एक रुपया इतकच मानधन घेतलं होतं.चित्रपट निर्माते निखिल अडवाणी यांनी नुकतीच 'रेडिओ मिर्ची'ला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीमध्ये त्यांनी सिनेविश्वातील सध्याचं वातावरण आणि आधीचं वातावरण यात नेमका कसा फरक आहे, यावर वक्तव्य केलं आहे. तसेच या दोन काळांमधील फरक सांगताना त्यांनी अमिताभ बच्चन यांचं एक उदाहरणसुद्धा दिलं आहे.मुलाखतीमध्ये निखिल अडवाणी यांना सिनेसृष्टीतील आधीचा काळ आणि आताचा काळ कसा आहे, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना ते म्हणाले, "आधीच्या व्यक्तींमध्ये प्रेम आणि माया होती. त्या काळी चित्रपट नात्यातील विश्वास आणि ताकद यांच्या आधारे बनवले जात होते.यावेळी निखिल अडवाणी यांनी अमिताभ बच्चन यांचा किस्सा सांगितला. ते म्हणाले, "माझ्या सिनेविश्वातील कारकिर्दीच्या काळात मी, सुरुवातीला 'यशराज फिल्म्स'बरोबर काम करत होतो. त्यावेळी अमिताभ बच्चन यांना यश चोप्रा यांनी सिलसिला या चित्रपटात काम करण्याची ऑफर दिली. त्यावेळी मानधन म्हणून तुला किती पैसे हवेत, असं त्यांनी विचारलं.

# ती प्रेमळ स्वभावाची आहे



बॉलीवूड अभिनेत्री नर्गिस फाखरीचे नाव सध्या चर्चेत आहे, याचे कारण म्हणजे तिची बहीण आलिया फाखरीचे नाव तिचा एक्स बॉयफ्रेंड एडवर्ड जेकब्सच्या हत्येच्या आरोपांमध्ये समोर आले आहे. नर्गिसने या चर्चेदरम्यान पहिल्यादांच सोशल मीडियावर पोस्ट केली असून ही पोस्ट व्हायरल होत आहे. नर्गिसने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली आहे. त्या स्टोरीत नर्गिसने फोटो पोस्ट केला असून त्याला एक लहानसे कॅप्शन दिले आहे.स्टोरीवर शेअर केलेल्या या फोटोमध्ये ती 'हाउसफुल ५'मधील सोनम बाजवा आणि जॅकलीन फर्नांडिस या दोन अभिनेत्रींबरोबर दिसत आहे. या फोटोसह तिने "आम्ही येतोय!" अशी कॅप्शन दिली आहे. 'हाऊसफुल ५'मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख, फरदीन खान यांच्यासह अनेक कलाकार झळकणार आहेत. हा चित्रपट एक मल्टिस्टारर चित्रपट असणार आहे. हा चित्रपट ६ जून २०२५ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून याचे दिग्दर्शन तरुण मनसुखानी करत आहेत. नर्गिस फाखरीच्या बहिणीवर तिच्या पूर्वाश्रमीचा प्रियकर एडवर्ड जेकब्सच्या हत्येचा आरोप आहे. तिला अमेरिकेतील रायकर्स आयलंड, न्यूयॉर्क येथे अटक करण्यात आली आहे.

# तुमचे वय झाले आहे

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखले जाणारे अभिनेते अमिताभ बच्चन सतत कोणत्या ना कोणत्या गोष्टींमुळे चर्चेत असतात. सध्या ते कौन बनेगा करोडपती या लोकप्रिय शोचे सूत्रसंचालन करताना दिसत आहेत. या कार्यक्रमात ते प्रेक्षकांबरोबर अनेक गोष्टी, किस्से शेअर करत असतात. याबरोबरच, ते तंत्रज्ञानाबरोबर स्वत:ला अपडेट ठेवताना दिसतात. आता नुकत्याच प्रदर्शित झालेल्या एका एपिसोडमध्ये बीग बींनी त्यांना जर गॅजेटसंबंधी काही प्रश्न पडले असतील तर ते त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना मदतीसाठी बोलवतात. त्यांची नातवंडे तसेच मुलगा अभिषेक यांची ते मदत घेतात.कौन बनेगा करोडपती' या शोमध्ये एका स्पर्धकाबरोबर बोलताना अमिताभ बच्चन यांनी म्हटले, "आपल्याला एखादा प्रश्न पडला तर त्याचवेळी आपल्याला उत्तर पाहिजे असते.

# बॉलीवूडमध्ये गटबाजी, 15 महिने काम नव्हतं

विवेक ओबेरॉयने २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कंपनी' चित्रपटातून मनोरंजन विश्वात पदार्पण केलं. यानंतर आलेल्या 'साथिया' चित्रपटात विवेक प्रेक्षकांना एका रोमँटिक हिरोच्या भूमिकेत पाहायला मिळाला. पण, बॉलीवूडच्या झगमगत्या दुनियेत अनेकदा कलाकारांना कठीण प्रसंगाचा सामना करावा लागतो. प्रचंड मेहनत घेऊनही विवेकला अनेक वर्ष फिल्म इंडस्ट्रीपासून दूर राहावं लागलं. यानंतर अभिनेत्याने मनोरंजन विश्वापासून पूर्णपणे ब्रेक घेत आपलं नशीब एका नव्या क्षेत्रात आजमावलं. उत्तम अभिनयाबरोबच आजच्या घडीला विवेक ओबेरॉय आघाडीचा व्यावसायिक म्हणून ओळखला जातो.विवेकने नुकतीच 'इंडियन एक्स्प्रेस'च्या 'स्क्रीन'ला मुलाखत दिली, यावेळी त्याने त्याच्या 'चॉकलेट बॉय' इरापासून, पुढे बॉलीवूडमधला संघर्ष ते यशस्वी व्यावसायिक असा सगळा प्रवास उलगडून सांगितला आहे.विवेकम्हणाला, "मी माझ्या करिअरच्या गेल्या २२ वर्षांमध्ये जवळपास ६७ प्रोजेक्ट्समध्ये काम केलंय. पण, या इंडस्ट्रीबाबत तुम्ही कोणत्याही प्रकारची शाश्वती देऊ शकत नाही. तुम्ही उत्तम काम करता, पुरस्कार जिंकता, आपलं काम व्यवस्थित मन लावून करता, एक अभिनेता म्हणून तुम्ही सगळ्या गोष्टी करता पण, इतकं सगळं करूनही तुम्हाला काही क्षुल्लक आणि वेगळ्याच कारणांनी काम दिलं जात नाही. २००७ मध्ये मी 'शूटआउट अॅट लोखंडवाला' या सिनेमात काम केलं होतं आणि त्यातलं 'गणपत...' हे गाणं प्रचंड व्हायरल झालं.

# टीम इंडिया उपांत्य फेरीत दाखल!

## भारताने यूएई 10 विकेट्सनी मात करत एकतर्फी विजय नोंदवला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**अंडर-१९ आशिया चषक २०२४ मध्ये भारतीय संघाने दमदार कामगिरी करत उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. आज भारताचा सामना यूएईशी झाला. ज्यामध्ये भारताने यूएई १० विकेट्सनी मात करत एकतर्फी विजय नोंदवला. आता उपांत्य फेरीतील भारताचे स्थान पक्के झाले आहे. सलग दोन सामने जिंकल्यानंतर भारतीय संघाचे आता चार गुण झाले आहेत. यूएईचा संघ भारताला कोणत्याच बाबतीत आव्हान देऊ शकला नाही, भारतासाठी आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशी यांनी पहिला विकेट्साठी १४३ धावांची भागीदारी केली.**





यूएईचा कर्णधार इयान खानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र कर्णधाराचा निर्णय चुकीचा ठरला. यूएई संघाला पहिला धक्का पाचव्या षटकात आर्यन सक्सेनाच्या रुपाने बसला. तो केवळ ९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर युएईचा संघ भारतासमोर आव्हान उभे करू शकेल असे एकदाही वाटले नाही. या संघासाठी सर्वात मोठी धावसंख्या रेयान खानने उभारली, ज्याने ४८ चेंडूत ३५ धावांची खेळी साकारली. तो यूएईचा एकमेव गोलंदाज ठरला, जो या डावात षटकार मारु शकला.यूएईचा संपूर्ण संघ ४४ षटकांत १३७ धावांत गारद झाला. यानंतर भारताला १३८ धावांचे लक्ष्य मिळाले होते. हे लक्ष्य भारतीय फलंदाजांसमोर अगदीच छोटे होते. भारताचे सलामीवीर वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांनी येताच शानदार फलंदाजी करत संघाची धावसंख्या काही वेळातच ५० धावांपर्यंत नेली. संघाने १०० धावांचा टप्पा ओलांडला तेव्हा १२ वे षटक अजून सुरूच झाले नव्हते. यानंतर या दोन्ही सलामीवीरांनी फटकेबाज सुरुच ठेवत १६.१ षटकांत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.भारतीय संघाने १६.१ षटकांत एकही विकेट न गमावता १३८ धावा करून सामना जिंकला आणि दोन गुणही मिळवले. भारताकडून वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांनी आपापली अर्धशतके पूर्ण केली. वैभव सूर्यवंशी याने ४६ चेंडूत ७७ धावांची दमदार खेळी साकारली. त्याचबरोबर आयुष म्हात्रेने ५१ चेंडूत ६७ धावांची दमदार खेळी केली. वैभव सूर्यवंशीवर बरेच लक्ष होते, कारण नुकत्याच झालेल्या आयपीएल लिलावात त्याला राजस्थान रॉयल्सने एक कोटींहून अधिक रुपयांना विकत घेतले होते. पहिल्या दोन सामन्यात मोठी खेळी साकारण्यात अपयशी ठरला होता, पण आज त्याने चौकार आणि षटकारांचा वर्षाव केला.यूएईचा कर्णधार इयान खानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र कर्णधाराचा निर्णय चुकीचा ठरला. यूएई संघाला पहिला धक्का पाचव्या षटकात आर्यन सक्सेनाच्या रुपाने बसला. तो केवळ ९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर युएईचा संघ भारतासमोर आव्हान उभे करू शकेल असे एकदाही वाटले नाही. या संघासाठी सर्वात मोठी धावसंख्या रेयान खानने उभारली, ज्याने ४८ चेंडूत ३५ धावांची खेळी साकारली. तो यूएईचा एकमेव गोलंदाज ठरला, जो या डावात षटकार मारु शकला.यूएईचा संपूर्ण संघ ४४ षटकांत १३७ धावांत गारद झाला. यानंतर भारताला १३८ धावांचे लक्ष्य मिळाले होते. हे लक्ष्य भारतीय फलंदाजांसमोर अगदीच छोटे होते. भारताचे सलामीवीर वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांनी येताच शानदार फलंदाजी करत संघाची धावसंख्या काही वेळातच ५० धावांपर्यंत नेली. संघाने १०० धावांचा टप्पा ओलांडला तेव्हा १२ वे षटक अजून सुरूच झाले नव्हते. यानंतर या दोन्ही सलामीवीरांनी फटकेबाज सुरुच ठेवत १६.१ षटकांत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

### एकही विकेट न गमावता 138 धावा

भारतीय संघाने १६.१ षटकांत एकही विकेट न गमावता १३८ धावा करून सामना जिंकला आणि दोन गुणही मिळवले. भारताकडून वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांनी आपापली अर्धशतके पूर्ण केली. वैभव सूर्यवंशी याने ४६ चेंडूत ७७ धावांची दमदार खेळी साकारली. त्याचबरोबर आयुष म्हात्रेने ५१ चेंडूत ६७ धावांची दमदार खेळी केली. वैभव सूर्यवंशीवर बरेच लक्ष होते, कारण नुकत्याच झालेल्या आयपीएल लिलावात त्याला राजस्थान रॉयल्सने एक कोटींहून अधिक रुपयांना विकत घेतले होते. पहिल्या दोन सामन्यात मोठी खेळी साकारण्यात अपयशी ठरला होता, पण आज त्याने चौकार आणि षटकारांचा वर्षाव केला.अंडर-१९ आशिया चषक २०२४ मध्ये भारतीय संघाने दमदार कामगिरी करत उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

---

## शतकानंतरही जैस्वाल-विराटला बसला फटका

# जो रूट अजूनही कसोटीत रँकिंगमध्ये अव्वल स्थानावर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**आयसीसी क्रमवारीत पुन्हा एकदा उलथापालथ झाली आहे. टीम इंडियाने शेवटच्या रँकिंगनंतर एकही सामना खेळला नसला, तरी पण यशस्वी जैस्वालला नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. जो रूट अजूनही कसोटीत रँकिंगमध्ये अव्वल स्थानावर असला तरी आता त्याला त्याच्याच जोडीदाराकडून आव्हान मिळताना दिसत आहे. दरम्यान, मोठी गोष्ट म्हणजे दक्षिण आफ्रिकेच्या टेम्बा बावुमाने टॉप-१० मध्ये प्रवेश केला आहे.**







आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या कसोटी क्रमवारीत इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट अजूनही पहिल्या क्रमांकावर कायम आहे. त्याचे रेटिंग सध्या ८९५ आहे. गेल्या सामन्यात तो चांगला खेळू शकला नव्हता, त्यामुळे त्याचे रेटिंग घटले आहेत. दरम्यान, इंग्लंडचा हॅरी ब्रूक आता दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याने दोन स्थानांची मोठी झेप घेतली आहे. आता त्याचे रेटिंग ८५४ झाले आहेत. याचा अर्थ असा की हॅरी आता जो रूटच्या जवळ येत आहे आणि येत्या काही आठवड्यांत जर त्याने त्याला मागे सोडले तर आश्चर्य वाटणार नाही. न्यूझीलंडचा माजी कर्णधार आजही पूर्वीप्रमाणेच तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याचे रेटिंग पॉइंट ८३० आहेत.गेल्या आठवड्यात दुसऱ्या स्थानावर पोहोचलेल्या भारताच्या यशस्वी जैस्वालची घसरण झाली आहे. त्याचे रेटिंग पॉइंट ८२५ इतकेच आहेत, जे आधी होते, परंतु आता तो चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. हॅरी ब्रूकमुळे जैयस्वालचे नुकसान झाले आहे. मात्र, ऑस्ट्रेलिया मालिकेतील दुसऱ्या सामन्यात त्याला मोठी खेळी खेळण्याची संधी मिळेल आणि तो पुन्हा त्याच स्थानावर विराजमान होईल.

### जसप्रीत बुमराहचे वर्चस्व कायम

टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचा कसोटी क्रिकेटमध्ये दबदबा कायम आहे. बूम-बूम बुमराह हा जगातील नंबर वन कसोटी गोलंदाज आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध पर्थ येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात बुमराहची कामगिरी अप्रतिम होती. भारतीय वेगवान गोलंदाजाने पहिल्या डावात कहर केला आणि पाच विकेट्स घेतल्या. त्याचवेळी बुमराहने दुसऱ्या डावातही तीन विकेट घेतल्या.